पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८६ /२०२२ दि. २६/०८/२०२२

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** अंबरनाथ शहरात अंबरनाथ वाहतुक उप विभाग कार्यक्षेत्रात दि. ३१/०८/२०२२ ते ०९/०९/२०२२ या कालावधीत गणेशोत्सव हा सण साजरा होणार असून दि. ०१/०९/२०२२ (दिड दिवसांचे), दि. ०४/०९/२०२२ (पाच दिवसांचे गौरी गणपती विसर्जन), दि. ०५/०९/२०२२ (गौरी गणपती विसर्जन) दि.०६/०९/२०२२ (सात दिवसांचे), दि. ०९/०९/२०२२ (अनंत चर्तुदशी) या कालावधीत गणपती विसर्जन मिरवणुकीमुळे कोणत्याही प्रकारे वाहतुकीची कोंडी होवु नये. या करिता सदर परिसरात वाहतूक सुरळीत व सुनिश्चित रहावी याकरिता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१ अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद–** १) आनंदनगर एम.आय.डी.सी – अंबरनाथ पुर्व रोटरी क्लब – शिवाजी चौक – स्वामी समर्थ चौक – हुतात्मा चौका– अंबरनाथ रेल्वे स्टेशनकडे जाणा–या जड/अवजड वाहने व बसेस यांना आनंदनगर एम.आय.डी.सी पेट्रोलपंप येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** आनंदनगर एम.आय.डी.सी पेट्रोलपंप मार्गे – टी.पॉईंट – फॉरेस्ट नाका – विमको नाका – डि.एम.सी चौक – गांधी चौक – मटका चौक – अंबरनाथ पुर्व पश्चिम उड्डाणपुलावरून – हुतात्मा चौक या ठिकाणी वाहतुकीस अडथळा होणार नाही अशा पध्दतीने बसेस मधील प्रवासी उतरवुन त्याच मार्गाने परत इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसचुना ही दि. ३१/०८/२०२२ ते ०९/०९/२०२२ या कालावधीत गणेशोत्सव हा सण साजरा होणार असून दि. ०१/०९/२०२२ (दिड दिवसांचे), दि. ०४/०९/२०२२ (पाच दिवसांचे गौरी गणपती विसर्जन), दि. ०५/०९/२०२२ (गौरी गणपती विसर्जन) दि. ०६/०९/२०२२ (सात दिवसांचे), दि. ०९/०९/२०२२ (अनंत चर्तुदशी) या कालावधीत सकाळी ११.०० वा. पासून गणेश मुर्ती विसर्जन कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील. सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( दत्तात्रय कांबळे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ.

CS CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी :—**
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ—४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**प्रतः—** पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :—** समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :—** सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग./प्रभारी अधिकारी, अंबरनाथ वाहतूक शाखा.
२/— संबंधीत नगरपरिषदाच्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner